यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत गौर तांडा ता.निलंगा जि.लातूर व मौजे ताजपूर ता.निलंगा, जि.लातूर येथील प्रत्येकी एका वसाहत प्रकल्पास मान्यता देणेबाबत शुद्धीपत्रक.

महाराष्ट्र शासन

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग

शासन ज्ञापन शुध्दीपत्रक क्रमांक : विभशा २०१८/ प्र.क्र.११/ विजाभज-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-२६ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ : शासन ज्ञापन क्र.विभशा-२०१८/प्र.क्र.११/विजाभज-२, दिनांक २१/२/२०१८

ज्ञापन (शुध्दीपत्रक) :-

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या वर्षात गौर तांडा ता. निलंगा जि.लातूर येथील १० कुटूंबांच्या एका वसाहतीकरिता रु.४४.३१ लक्ष व मौजे ताजपूर ता. निलंगा, जि.लातूर येथील ३० कुटूंबाच्या एका वसाहतीकरिता रु.१३२.९४ लक्ष इतक्या खर्चास या संदर्भाधीन ज्ञापनान्वये विहित अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

२. सदर ज्ञापनातील परिच्छेद क्र.३ मध्ये दुरुस्ती करण्यात येऊन सदरहू परिच्छेद खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

सुधारित परिच्छेद- सदरहू योजनेच्या अंमलबजावणीसाठी संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. सदरहू योजनेसाठी आवश्यक असलेल्या दोन वसाहतींकरिता (४० कुटूंबे) रू.१७७.२५ लक्ष एवढी तरतूद संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सबंधित यंत्रणेस वितरीत करतील. संबंधित जिल्हाधिकारी, सहायक आयुक्त, समाज कल्याण, लातूर व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, लातूर यांनी सर्व अटी व शर्तीची पूर्ततेशिवाय निधी खर्च करू नये.

३. सदर शासन ज्ञापन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०२२८१३२३१५९२२२ असा आहे. हे ज्ञापन शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao
Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.02.28 13:24:42 +05'30'

(भा.र.गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. जिल्हाधिकारी, लातूर.
२. संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,पुणे
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई

४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपुर
५. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, लातूर
६. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
८. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर
९. निवड नस्ती (विजाभज-२).